# प्रेस नोट

## आरोग्य विभागातील कनिष्ठ लिपीक अे.सी.बी.च्या जाळयात

आरोग्य विभागातील रमेश विठ्ठल बोंदरे, वय ५४ वर्ष पद कनिष्ठ लिपीक, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय भंडारा यांना ८०००/— रूपये लाच स्विकारतांना ॲन्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. आरोग्य विभागाच्या कनिष्ठ लिपीकावर ॲन्टी करप्शन ब्युरोने केलेल्या कार्यवाही मुळे प्रचंड खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे राजीव गांधी  चौक भंडारा येथील रहिवासी असुन आईसक्रिम पार्लर व कॅफे चालविण्याचा व्यवसाय करतात. तक्रारदार यांचे वडील आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक म्हणुन कर्तव्यावर होते. एप्रील २०१६ मध्ये त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्विकारली होती. त्यांच्या पेंन्शन प्रकरणाची फाईल नागपूर येथील वेतन पडताळणी कार्यालयात पाठवून पेन्शन प्रकरण मंजुर करवून देण्यासाठी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाचे कनिष्ठ लिपीक रमेश विठ्ठल बोंदरे यांनी ८०००/— रूपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराची कनिष्ठ लिपीक बोंदरे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा येथे येवुन तक्रार दिली.

लचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा येथील पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अंत्यत गोपनिय रित्या शहानिशा करून आरोग्य विभागातील लिपीक यांचे विरूध्द योजनाबध्दरित्या दिनांक २३/१०/२०१९ रोजी सापळा रचला कनिष्ठ लिपीक बोंदरे यांनी तक्रारदारास त्याच्या वडीलांच्या पेंन्शन प्रकरणाची फाईल नागपूर येथील वेतन पडताळणी कार्यालयात पाठवून पेन्शन प्रकरण मंजुर करवून देण्यासाठी ८०००/— रूपये लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या टिमने रंगेहात पकडले. आरोग्य विभागाचे लिपीक बोंदरे यांचे विरूध्द पोलीस स्टेशन भंडारा येथे गुन्हा नोंद करून अटक करण्यात आले. आरोग्य विभागाचे लिपीक बोंदरे यांच्या कारधा येथील निवासस्थानाची झडती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा येथील टिमद्वारा करण्यात आली.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्रीमती रश्मी नांदेडकर, अपर पोलीस अधिक्षक राजेश दुद्दलवार, पोलीस उप अधिक्षक श्री. चाटे साहेब, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी, स.फौ. गणेश पडवार, पो.हवा कुरंजेकर, सचिन हलमारे, अश्विन गोस्वामी, पराग राऊत, सुनिल हुकरे, कृणाल कढव, दिनेश धार्मीक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा यांनी केली आहे.